**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यार्थ्यांसाठी नॅशनल ॲकेडेमिक क्रेडीट बॅंक सुरू करणार - डॉ. भूषण पटवर्धन

## विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिवस कार्यक्रमाचे उद्‌घाटन

अमरावती.

विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारा विद्यार्थ्यांसाठी नॅशनल ॲकेडेमिक क्रेडीट बॅंक सुरू करणार असून त्या अंतर्गत नियमित अभ्यासक्रमासाठी ८० क्रेडीट, तर त्या व्यतिरिक्त इतर अभ्यासेत्तर उपक्रमांसाठी २० क्रेडीट, असे १०० क्रेडीट असणार असून विद्यार्थ्यांना मिळालेले क्रेडीट नॅशनल ॲकेडेमिक क्रेडीट बॅंकमध्ये जमा होतील, त्याचा विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी खूप फायदा होणार असल्याची माहिती विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्लीचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी दिली.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आणि नॅशनल कॉऊन्सिल फॉर सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी कम्युनिकेशन (एन.सी.एस.टी.सी.), भारत सरकार व राजीव गांधी सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी कमिशन, महाराष्ट्र शासन यांचे संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विज्ञान दिवस कार्यक्रमाचे उद्घाटन विद्यापीठ दृकश्राव्य सभागृहात संपन्न झाले, त्याप्रसंगी प्रमुख अतिथी तथा उद्घाटक म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, प्रभारी कुलसचिव डॉ. हेमंत देशमुख, आय.आय.एल.चे संचालक डॉ.डी.टी. इंगोले, एन.एस.डी.चे समन्वयक डॉ. नितीन फिरके उपस्थित होते.

भौतिकशास्त्र विभागात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शनीचे फित कापून उद्घाटन डॉ. भूषण पटवर्धन यांचे शुभहस्ते करण्यात आले. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध विज्ञान प्रदर्शनीचे निरीक्षण त्यांनी यावेळी केले. उद्घाटनपर भाषणात ते म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपली क्षमता ओळखली पाहिजे. समाज व पर्यायाने देशासाठी आपले ज्ञान कसे उपयोगी पडेल, यादृष्टीने विद्यार्थ्यांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. शिक्षकांपेक्षाही विद्यार्थी अधिक ज्ञान प्राप्त करतात, ही भारताच्या उज्वल भविष्यासाठी दिशादर्शक बाब आहे. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाच्या अनेक नवनवीन कल्पना रूजविण्याची गरज आहे. त्यांना प्रश्न पडले पाहिजेत, यासाठी शिक्षकांनी पुढे येवून कार्य करण्याची गरज आहे. विद्यापीठस्तरीय शिक्षकांपेक्षा शालेय शिक्षकांना जास्त सन्मान देत असल्याचे ते म्हणाले.

विद्यापीठ परिसरात मोठ्या प्रमाणावर काम झाल्याचे पाहून आनंदात असल्याचे त्यांनी सांगितले. महाविद्यालये व विद्यापीठे विकसित झाली तर यु.जी.सी. चा दर्जा सुद्धा वाढतो. कुठल्याही संस्थेचे यश आणि विकास हा नेतृत्वावर अवलंबून असतो. कुशल, सक्षम, सर्वगुण संपन्न नेतृत्व कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांच्या रूपाने या विद्यापीठाला लाभल्यामुळे उत्कृष्ट आणि दर्जेदार कामे या विद्यापीठातून होत असल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला. भारतीय संस्कृती, आयुर्वेद श्रेष्ठ आहे, ती आपली शक्तीस्थळे आहेत. ती ओळखली पाहिजे, त्यासाठी भारतीयांना जागृत करण्याची गरज आहे. याशिवाय विविध समाजोपयोगी उपक्रम महाविद्यालयांनी व विद्यापीठांनी राबवावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. समाजाशी आपले विद्यार्थी जुळतील, यासाठी उन्नत भारत अभियान महत्वाचे आहे. केवळ पारंपारिक पद्धतीने शिक्षण न देता, विद्यार्थी सक्षम, परिपूर्ण होईल, अशी शिक्षणपद्धती राबवावी आणि देशाच्या, शिक्षण क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी पुढे यावे व आपला विद्यार्थी सक्षम बनवावा, यावर त्यांनी भर दिला.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर म्हणाले, परीक्षा उत्तीर्ण होण्यापुरते विद्यार्थ्यांना ज्ञान न देता, प्रात्याक्षिक ज्ञान त्याला दिले जावे. डॉ.सी.व्ही. रमण यांनी अगदी कमी वयात उच्चशिक्षण घेतले. नोबेल पारितोषिकही मिळविले. येत्या दहा वर्षात आमचे विद्यार्थी नोबेल पारितोषिके प्राप्त करण्याचे उद्दिष्ट ठेवतील व ते पूर्ण करण्याचा प्रयत्न करतील, असे आवाहन त्यांनी केले. बुद्धीमत्तेवर आधारित शिक्षणपद्धती विकसित होण्याची खऱ्याअर्थाने गरज असून यु.जी.सी. द्वारे त्यावर विचार होईल. समाजाच्या विकासासाठी आजची तरूण पिढी उपयुक्त ठरत आहे. विद्यार्थ्यांनी आपली उपयुक्तता वाढविली, तरच आपल्या देशाचा सर्वांगीण विकास होण्यास हातभार लागेल, असेही ते म्हणाले.

विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरूवात झाली. संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पाहुण्यांचे स्मृतिचिन्ह व रोपटं देवून प्रभारी कुलसचिव यांनी स्वागत केले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय एन.एस.डी. समन्वयक डॉ. नितीन फिरके यांनी करून दिला. संचालन डॉ. निरज घनवटे यांनी, तर आभार डॉ. मनिषा कोडापे यांनी मानले. उद्घाटन कार्यक्रमाला व्य.प. सदस्य डॉ. प्रसाद वाडेगांवकर, अधिष्ठाता डॉ. मनिषा काळे, संचालक डॉ. श्रीकांत पाटील, संचालक डॉ.एस.एफ.आर. खाद्री, शिक्षक, शैक्षणिक विभागांचे विभागप्रमुख, महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति,　　　　　　　　　　　　　　　　　　　　　**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी　　　　　　　　　　　　दि. २८/०२/२०१९.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी